Light of Life Trust

# लाईट ऑफ लाईफ टाईम्स

**अंक क्र.२६** जुलै २०२४

## आमचे लक्ष्य

**गरिबीचे दुष्टचक्र तोडणे, एकावेळी एक जीवन.**

आम्ही गेल्या १९ हून अधिक वर्षांपासून भारताच्या ग्रामीण भागातील एकुण ५,४८,०३९ लोकांना लाभान्वित केले आहे. आमच्या 'आनंदो' आणि 'जागृती' या कार्यक्रमांच्या माध्यमातून आमचे कार्यक्षेत्र हे शिक्षण, समुदाय आणि कौशल्य विकास, आरोग्यसेवा आणि पर्यावरण संवर्धन या बाबींपर्यंत विस्तारलेले आहे.

## आमचे विश्वस्त मंडळ


- **श्रीमती विली डॉक्टर,** संस्थापिका आणि व्यवस्थापकीय विश्वस्त
- **श्रीमती गायत्री रुईया,** विश्वस्त
- **श्री. जितेंद्र मेहता,** विश्वस्त
- **श्री. पुनीत बी. आनंद,** विश्वस्त
- **श्री. आश्दिन डॉक्टर,** विश्वस्त


## 'लाईट ऑफ लाईट ट्रस्ट'ला टाटा मुंबई मॅरेथॉन चॅरिटी नाईट, २०२४ च्या सोहळ्यात २ पुरस्कार देण्यात करण्यात आले.







५ एप्रिल २०२४ रोजी मुंबई येथील आय.टी.सी. ग्रँड येथे टाटा मुंबई मॅरेथॉन चॅरिटी नाईट, २०२४ हा सोहळा पार पडला. निधी उभारणीचे काम उल्लेखनीयरित्या पार पाडल्यामुळे 'लाईट ऑफ लाईट ट्रस्ट'च्या संस्थापिका व व्यवस्थापकीय विश्वस्त श्रीमती विली डॉक्टर यांना या सोहळ्यात 'चेंज लेजेंड' या पुरस्काराने गौरवण्यात आले. सर्वाधिक निधी संकलन करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांपैकी चौथ्या क्रमांकाची स्वयंसेवी संस्था म्हणून 'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट'ला हा पुरस्कार देण्यात आला.

## इ.एस.जी. – सी.एस. आर समीटमधे सन्मान मिळाला.







२१ जून २०२४ रोजी हैद्राबाद येथे झालेल्या इ.एस.जी. सी.एस.आर समीटमधे 'लाईट ऑफ लाईट ट्रस्ट'ला 'ग्रामीण भागातील शिक्षण' या श्रेणीत काम करणारी सर्वोत्तम स्वयंसेवी संस्था म्हणून गौरवण्यात आले. श्री.रमेश दासवानी (मुख्य कार्यकारी अधिकारी, लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट), यांनी विनम्रपणे 'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट' च्या वतीने या पुरस्काराचा स्वीकार केला. ग्रामीण भागातील समुदायांचे सक्षमीकरण करणे, त्यांतील तफावत कमी करणे आणि त्यांच्याकरिता रोजगाराच्या संधी निर्माण करणे ह्या 'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट'च्या ध्येय्यावर या पुरस्कारामुळे शिक्कामोर्तब झाले आहे.कारण ही टीम, संस्थेच्या ध्येयांचे अथकपणे समर्थन करणारा 'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट'चा कणा आहे.

## यशोगाथा
### निर्धार व कठोर परिश्रमापासून ते नोकरीत बढतीपर्यंत : खंडू मंजुळे यांचा प्रेरणादायी प्रवास

महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील कर्जत केंद्रातील 'आनंदो'चा एक संवेदनक्षम आणि महत्त्वाकांक्षी विद्यार्थी खंडू मंजुळे याचा प्रवास प्रेरणादायी आहे. दृढनिश्चयात असलेली ताकद, शिक्षण व समुदायाच्या सेवेकरिता असलेली अढळ बांधिलकी याचे ते एक उदाहरण आहे. खंडुला त्याच्या यशाच्या मार्गावर अनेक आव्हानांना तोंड द्यावं लागलं. आर्थिक अडचणींपासून ते सामाजिक अपेक्षांपर्यंत अनेक अडथळ्यांनाही सामोर जावं लागलं. या सगळ्यामुळे कोणीही नक्कीच नाउमेद झाले असते. पण खंडुच्या हे लक्षात आले होते की, शिक्षण हीच उत्तम भविष्याची गुरूकिल्ली आहे व त्याने तिचा अढळ निर्धाराने पाठपुरावा केला.

खंडुने वाणीज्य शाखेतून पदवीचं शिक्षण पूर्ण केले हे त्याच्या समर्पित वृत्तीचेच यश होते. त्याच्या या शैक्षणिक कामगिरीने त्याच्या करिअरविषयीच्या महत्त्वाकांक्षांचा भक्कम पाया घातला. समुदाय सेवेकरिता असलेल्या वचनबद्धतेमुळे त्याला 'युनायटेड वे' या सामाजिक पातळीवर परिणाम घडवून आणणाऱ्या स्वयंसेवी संस्थेमधे काम करायची संधी मिळाली. खंडू प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर जाऊन कर्मचारी म्हणून काम करायचा. त्याने उत्साहाने अशा प्रकल्पांमधे भाग घेतला ज्यांनी लोकांच्या आयुष्यावर थेट परिणाम झाला. खंडुच्या या प्रयत्नांची दखल घेत आता त्याला प्रकल्प अधिकारी म्हणून बढती मिळाली आहे.




## यशोगाथा
### ग्रामीण भागातील मुलाने कॉर्पोरेट क्षेत्रात मिळवलेले यश : योगेश मगरच्या यशाची वाटचाल

हिंमत आणि निर्धाराने आपले ध्येय साध्य करणाऱ्यांचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे 'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट'च्या जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील नुतन वसाहत येथील आनंदो केंद्रातील योगेश मगर. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत योगेश मगर याने वाणीज्य शाखेतून आपले एम.बी.ए.चे पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. नंतर त्याला 'होम फायनॅन्स' मधे 'रिलेशनशीप मॅनेजर' म्हणून नोकरी मिळाली आणि त्याला रु.६,००,०००/- एवढे पॅकेज आहे. आजच्या काळात नोकरीच्या क्षेत्रातली आव्हाने आणि वित्तव्यवस्था क्षेत्रातली स्पर्धा लक्षात घेता त्याला ही नोकरी मिळणे हे नक्कीच कौतुकास्पद आहे. त्याच्या या यशामागे त्याच्या आई-वडीलांचा मोठा हात आहे. स्वत: अशिक्षित असुनही आणि रोजंदारीवर काम करत असतानादेखील त्यांनी योगेशला त्याच्या शिक्षणासाठी कायम प्रोत्साहनच दिल, पाठिंबा दिला. त्या दोघांनाही योगेशने मिळवलेल्या या यशाबद्दल त्याचा खूप अभिमान वाटतो.



## माध्यमिक शाळेतील इयत्ता १०वी तील गुणवंत विद्यार्थी

'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट'च्या 'आनंदो'चे **९२%** विद्यार्थी १०वी ची परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण झाले आहेत.

**प्रथम क्रमांक** — ९४.६०% — वाशीम विभाग — **श्रद्धा कुंडलीक ढोबळे**

**द्वितीय क्रमांक** — ९४.००% — वाशीम विभाग — **वैष्णवी संतोष बरगड**

**तृतीय क्रमांक** — ९२.८०% — वाशीम विभाग — **जागृती गगन नागरे**

**चौथा क्रमांक** — ९२.८०% — वाशीम विभाग — **प्रांजल संभाजी चेमटे**

**पाचवा क्रमांक** — ९२.६०% — वाशीम विभाग — **संजना गजानन गायकवाड**

## उच्च माध्यमिक शाळेतील इयत्ता १२वी तील गुणवंत विद्यार्थी

'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट'च्या 'आनंदो प्लस'चे विद्यार्थी १२वी **९३%** ची परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण झाले आहेत.

**प्रथम क्रमांक** — ८९.८३% — यवतमाळ विभाग, दिग्रास केंद्र, वाणीज्य शाखा — **संकेत भानुदास**

**द्वितीय क्रमांक** — ८९.३६% — यवतमाळ विभाग, दिग्रास केंद्र, वाणीज्य शाखा — **सुयश एस. श्रीखंडे**

**तृतीय क्रमांक** — ८८.५०% — वाशीम विभाग, शेंदुरजना केंद्र, वाणीज्य शाखा — **निकीता गणेश रबडे**

**चौथा क्रमांक** — ८८.५०% — राजस्थान विभाग, भिजोलिया केंद्र, कला शाखा — **पुजा रजोई खाटीक**

**पाचवा क्रमांक** — ८३.००% — भाटेपुरी केंद्र, वाणीज्य शाखा — **सानेराव बळीराम आटोळे**

## जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने शेतकऱ्यांचा सन्मान

५ जून २०२४ रोजी जगभरात साजरा होत असलेल्या 'जागतिक पर्यावरण दिना'च्या महोत्सवात 'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट' देखील सहभागी झाली. आपल्याच ध्येयांचा एक अविभाज्य भाग असलेल्या 'परिसंस्था पुनरुज्जीवन' या विषयाला घेऊन संस्थेने हा महोत्सव साजरा केला.
जागृती विभागाच्या पर्यावरण संवर्धन शाखेच्या समुहाने त्यांच्या विभागातील समर्पित शेतकऱ्यांना सन्मानीत केले. या शेतकऱ्यांनी हरित भविष्याची हमी देणाऱ्या रीतींचा स्वीकार केला व जमीनीचे जतनदेखील केले. त्यांनी फक्त शेतीच केली नाही तर पर्यावरणाचे संरक्षणही केले.

पर्यावरण संवर्धन विभागाच्या अंतर्गत 'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट' ने यावर्षी वेगवेगळ्या सी.एस.आर.च्या उपक्रमांसोबत भागीदारी केली. त्याद्वारे संस्थेने ७१ गावांत मिळून १,५५० शेतकऱ्यांना सक्षम बनवले. 'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट'च्या समुहाने वेगवेगळ्या प्रशिक्षण सत्रांच्या माध्यमांतून शेतकऱ्यांना सर्वोत्कृष्ट शेतीपद्धतींची माहिती देऊन सुसज्ज केले. अगदी रोपांच्या मांडणीपासून ते सिंचनाचे आधुनिक तंत्र यांबद्दलच्या तसेच उत्पादनक्षमता वाढवणाऱ्या व त्याचबरोबर अमुल्य अशा नैसर्गिक साधनसंपत्तीचे रक्षण करणाऱ्या व सहज अंगीकारता येण्यासारख्या शाश्वत शेतीपद्धतींची माहिती त्यांना देण्यात आली.

ब्लॅकसॉईल प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सहयोगाने आयोजित करण्यात आलेल्या सन्मान सोहळ्यात त्यादिवशी ब्लॅकसॉईल प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडून आलेले प्रतिनिधी व त्याचबरोबर 'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट'चे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत ४२ शेतकऱ्यांचा त्यांच्या बांधिलकी व समर्पितवृत्ती यांकरिता सन्मान करण्यात आला.









| गावाचे नाव | शेतकऱ्याचे नाव |
|---|---|
| सोंडेवाडी | जैतु धाऊ धुमणे |
| चंगेवाडी | सुहास विठ्ठल हेमडे |
| नानीचामाळ | गणेश धाकु गोरे |
| कटवन अ | शांताराम महादू चौधरी |
| कटवन ब | वामन खान्हू धुमणे |
| पदीरवाडी | पांडुरंग शंकर झुगारे |
| टाकीचीवाडी | प्रकाश हिरू शिंगवा |
| नवीन सिद्धगड | विठ्ठल बारकू कोकाटे |
| इस्ते जांभुळवाडी | हरिचंद्र गोविंद इस्ते |
| बोरीचीवाडी | करण मालू मेंगळ |

| गावाचे नाव | शेतकऱ्याचे नाव |
|---|---|
| कुडेरान | बाळा धर्मा निरगुडा |
| नांबेरवाडी | हरिश्चंद्र देहू शीड |
| बनाचीवाडी | शिवराज किसन वाघ |
| चिंचवाडी | जयदास आंबो आगीवले |
| वाघ्याची वाडी | मनीषा भगवान पारधी |
| पारधवाडी | मंगल हरी पारधी |
| बनाचीवाडी (झाडगर) | नवसु बुधाजी मेंगळ |
| केवारवाडी | आण्णा पांडू निरगुडा |
| मोहाचीवाडी | राघो बाळू वाघ |
| झाडघर | केशव रामा वाख |

| गावाचे नाव | शेतकऱ्याचे नाव |
|---|---|
| लाखचीवाडी | गणेश बाबू मुकणे |
| वैतागवाडी | विष्णू दत्ता पवार |
| तळेवाडी | बाबन राघो वाघ |
| खडकीचीवाडी | अशोक यशवंत वाघ |
| पिंपळपाडा | सुभास लक्ष्मण खरात |
| कातकरवाडी (मोगराज) | अरुणा कैलास पवार |
| रामनगरवाडी | रोहन जानू मुकणे |
| बागवाडा | अरूण रामू सांबारी |
| उदलडोह | धाऊ रामा शिंगवा |
| भोईरवाडी | वैभव लाहू मेंगळ |

| गावाचे नाव | शेतकऱ्याचे नाव |
|---|---|
| करपटवाडी | विलास भाऊ भाला |
| मोरोशी | विठ्ठल तुळा दरवडा |
| आंबेमाळी | भास्कर गोपाळ भाला |
| धारखिंड | नामदेव पांडुरंग शेंडे |
| मोधळवाडी | मंगल विठ्ठल शेंडे |
| बांधेशेत | अरुण काळुराम खाकर |
| काट्याची वाडी | काशीनाथ दत्तू सोंगळ |
| डोंबेरेवाडी | हनुमंत नागो मेंगळ |
| बनगरवाडी | अशोक जानू निरगुडा |
| डोंगरवाडी | नवसू खेमा कवटे |
| सुकळवाडी | निलेश नारायण शीड |
| फगुलगव्हान | देऊ भिका भाला |

# बातम्या आणि ताज्या घडामोडी

## जागतिक पुस्तक दिन– ‘लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट’च्या आनंदो शाळा सक्षमीकरण कार्यक्रमाचा भाग असेलेल्या जनता विद्यामंदिर प्रशाळा या दहीवली येथील शाळेत साजरा केला गेला.



रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील दहीवली गावात असलेल्या जनता विद्यामंदिर प्रशाळेत २३ एप्रिल रोजी पुस्तकवाटप कार्यक्रमाच्या माध्यमातून जागतिक पुस्तक दिन साजरा करण्यात आला. शाळेच्या उन्हाळी सुट्टीत मुलांना वाचनाची गोडी लागावी या उद्देशाने ‘लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट’च्या आनंदो शाळा सक्षमीकरण कार्यक्रमाचा समुह व शाळेतील शिक्षक यांनी पुढाकार घेऊन हा उपक्रम राबवला. हा उपक्रम पुस्तकवाटपापर्यंतच मर्यादित राहिला नाही. याहीपुढे जाऊन तो ज्ञानाचा उत्सव बनला व त्यावेळी साक्षरतेचा प्रायोजकही बनला. तो साहित्याच्या विश्वात मुलांनी एक डुबकी मारावी यासाठीची प्रेरणाही बनला. या उपक्रमात शिक्षकांनी आणखी एक नाविन्यपूर्ण भर घातली. त्यांनी मुलांना पुस्तक वाचून झाल्यावर त्याचा सारांश सांगणारा व्हिडीओ बनवण्यास सांगितले. त्यामुळे मुलांचा वाचनाचा अनुभवदेखील वाढेल. याशिवाय मुलांमधे पुस्तकांबद्दलची एक सखोल समजही निर्माण होईल व पुस्तकांबद्दल त्यांच्या मनात कौतुकाच्या भावनेची जोपासनाही होईल. आता इथून पुढे हा पुस्तकवाटप उपक्रम म्हणजे वाचनसंस्कृती जोपासण्यासाठीची शाळेची समर्पितवृत्ती दर्शवणारा एक कायमस्वरूपी असा उपक्रम बनेल अशी शाळेच्या मुख्याध्यापकांनी पुष्टी दिली.

## देवनार रोटरी क्लब आणि राष्ट्रीय बर्न सेंटर यांच्या प्रतिनीधींची कर्जत तालुक्यातील तिवरे येथील जीवन आशा समुदाय केंद्राला भेट :

‘लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट’च्या रोजगार प्रशिक्षण व कौशल्यविकास कार्यक्रमाच्या समुहाने ११ मे २०२४ रोजी देवनार येथील रोटरी क्लबचे काही प्रतिनिधी व राष्ट्रीय बर्न सेंटर, मुंबई यांचे काही प्रतिनीधी अशा काही सन्माननीय पाहुण्यांचे स्वागत केले. देवनार रोटरी क्लबच्या ६ सदस्यांच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व त्यांच्या प्रमुख श्रीमती संगीता सहानी यांनी केले. राष्ट्रीय बर्न सेंटर, मुंबई येथील डॉ.केशवानी व त्यांचे ५ सहकर्मचारी हेदेखील यावेळी उपस्थित होते. श्री.रमेश दासवानी, (मुख्य कार्यकारी अधिकारी, लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट) तसेच ‘लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट’चा कर्जत येथील समुह यांच्या उपस्थितीत पाहुण्यांनी लाभार्थींशी संवाद साधला. ‘लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट’च्या विभागांच्या आढाव्यामुळे संस्था करत असेलेल्या कामाविषयीची एक जास्त व्यापक समज तयार झाली.





## युनिव्हर्सल ए.आय. विद्यापीठाचा संस्थापन विकास कार्यक्रम : शाश्वत भविष्यासाठी प्रमुखांना सक्षम बनवणे

२९ मे २०२४ रोजी कर्जत येथील युनिव्हर्सल ए.आय. विद्यापीठाने ‘लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट’च्या प्रमुखांकरिता एक संस्थापन विकासाचा कार्यक्रम आयोजित केला होता. युनिव्हर्सल ए.आय. विद्यापीठाच्या सेंटर फॉर एक्सलन्स ऑफ सोशल, सस्टेनेबल ॲण्ड स्पिरीच्युअल डेव्हलपमेंट यांचा एक भाग म्हणून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या दरम्यान खालील सत्रांचे आयोजन करण्यात आले



- **‘लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट’साठी धोरणात्मक भूमिका व नियोजन (प्राध्यापक – श्री. श्रीराम रामशंकर) :** या सत्रात प्राध्यापक रामशंकर यांनी ‘लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट’च्या दृष्टीकोनातून असलेल्या नेतृत्वगुणांच्या धोरणात्मक पैलुंबाबत भाष्य केले. सहभागींनी परिणामकारक नियोजन, दूरदृष्टीशी असलेली प्रमाणबद्धता आणि दीर्घकाळ टिकणारा प्रभाव इत्यादींचे विश्लेषण केले.

- **परिणामाचे मूल्यमापन व मापदंड** (ब्रि. जी.पी.एस. चीमा) : ब्रिगेडिअर चीमा यांनी नेतृत्वगुणांशीसंबंधित असलेल्या उपक्रमांच्या परिणामांचे मूल्यमापन या विषयावर एक चर्चा घेतली. ही चर्चा विचारांना चालना देणारी होती. अर्थपूर्ण बदल घडवून आणण्याकरिता परिणामांचे संख्यात्मकदृष्ट्या आणि गुणात्मकदृष्ट्या असे दोन्हीप्रकारचे मूल्यमापन करण्यावर या सत्राने भर दिला.



- **नेतृत्वाशी संबंधित गुणांचे संवर्धन** (ब्रि. जी.पी.एस. चीमा) : ब्रिगेडिअर चीमा यांनी नेतृत्वगुण वाढवण्या करिता त्यासंबंधीचे आपली अतर्दृष्टी दिली. या सत्रात सहभागींना भावनिक बुद्धीमत्तेपासून ते सुसंगत अशा नेतृत्वापर्यंत आपली परिणामकारकता वाढवण्यासाठीच्या प्रत्यक्षात वापरायच्या तंत्रांबद्दल कळले.

**प्रमुख या नात्याने ‘लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट’च्या समुहाने त्यांच्याबरोबर शाश्वत पद्धती, सामाजिक प्रभाव व आध्यात्मिक प्रगती यांच्याकरिता असलेले एक नवीन वचन घेतले आहे.**

# बातम्या आणि ताज्या घडामोडी

## स्वप्नांची जोपासना : 'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट'च्या सदस्यांची हैद्राबाद येथील आर.बी.एल. शाळेला भेट

श्री.रमेश दासवानी (मुख्य कार्यकारी अधिकारी, लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट) यांना आर. बी. एल. बँके तर्फे आर्थिक सहाय्य पुरवल्या जाणाऱ्या हैद्राबाद येथील आर.बी.एल. शाळेला भेट देण्याचा मान मिळाला. मुलांसाठी फायदेशीर ठरतील व त्यांच्या आकांक्षांना प्रज्वलित करतील अशा सहयोगी शैक्षणिक कार्यक्रमांचा शोध घेणे हा या भेटीचा हेतू होता. या भेटी दरम्यान विद्यार्थ्यांनी त्यांच्या डॉक्टर, अभियंता, कलाकार व व्यावसायिक होण्याच्या इच्छा बोलून दाखवल्या. त्यांची आनंदीवृत्ती आणि करिअरबद्दलची जागरुकता पाहता ह्या गोष्टी प्रेरणेचा एक स्त्रोत होत्या.

श्री.मुरलीधरन, श्री.विवेक वर्मा, श्री.मुजाहिद्दीन आणि शाळेचे मुख्याध्यापक यांनी दिलेल्या कणखर पाठींब्याकरिता संस्था त्यांची आभारी आहे. शिवाय अशाप्रकारचे उपक्रम प्रत्यक्षात राबवण्याकरिता व त्याकरिता लागणाऱ्या त्यांच्या समर्पितवृत्तीकरिता आणि आम्हाला या उपक्रमांचा भाग बनण्याची संधी दिल्याकरिता 'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट' त्यांची आभारी आहे. शक्यतांच्या जाणीवांची जोपासना करण्यासाठी आणि बाल व तरुण यांच्या बुद्धीचे संगोपन करण्यासाठी नवीन शैक्षणिक मार्ग तयार करण्याकडे 'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट'चा कल असेल.





## ग्रामीण भागातील शाळांचे सक्षमीकरण : एज.एफ.एक्स. टेक सोबत 'स्टेम' करिता भागीदारी आणि टिंकरींग लॅबसोबत भागीदारी

२६ जून २०२४ रोजी 'एज एफ.एक्स. टेक'कडून 'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट'ला एका प्रेरणादायी उपक्रमासाठी सहयोग करण्याकरिता आमंत्रित करण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातून स्टेम (सायन्स, टेक्नॉलॉजी, इंजिनीअरींग आणि मॅथेमॅटीक्स) आणि 'टिंकरींग लॅब्स' राज्यभरातील अशा ग्रामीण शाळांपर्यंत पोहोचणार आहे ज्यांमधे 'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट'ने आपला ठसा उमटवला आहे.

श्री.रमेश दासवानी (मुख्य कार्यकारी अधिकारी, 'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट' ) यांची 'एज एफ.एक्स. टेक'च्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती कामिनी गुप्ता यांसोबत एक चांगली चर्चा झाली. या दोघांनाही शिक्षणाची व नाविन्यतेची विशेष आवड असल्यामुळे त्यांची ही चर्चा अधिकच रंगली. शाळांमधे तंत्रज्ञानाची मंडळे कोणकोणत्या प्रकारे स्थापन केली जाऊ शकतील जेणेकरून मुलांना प्रत्यक्ष अनुभव घेता येणे शक्य येईल व त्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळेल याचा त्यांनी आढावा घेतला.





## सामर्थ्यवान बनवणारी नाती : अलिबाग येथील बेलोशी केंद्राला भेट

दीर्घ काळापासून 'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट'च्या सोबत असलेल्या एका समर्पित साथीदाराने 'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट'च्या अलिबाग तालुक्यातील 'बेलोशी' येथील आनंदो केंद्राला भेट दिली. त्याचबरोबर शाळेतील शालेय साहित्यवाटपाच्या वार्षिक कार्यक्रमालाही ते उपस्थित होते. त्यावेळी त्यांनी 'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट'च्या लाभार्थींबरोबर संवाद साधला. 'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट'ने हाती घेतलेल्या कामाच्या प्रभावाचे प्रत्यक्ष साक्षीदार बनण्याची संधी त्यांना लाभली. लाभार्थी विद्यार्थ्यांनी त्यांची भविष्यातील स्वप्ने बोलून दाखवली. तर 'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट'च्या कामामुळे लाभार्थी मुलांसमोर उज्ज्वल भवितव्याच्या संधी उपलब्ध झाल्यामुळे त्यांच्या पालकांनी या कार्यक्रमात संस्थेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

**भेटीला आलेल्या 'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट'च्या देणगीदाराच्या प्रतिनीधीने 'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट'चे विशेषत:** अथक मेहनत घेणाऱ्या शिक्षकांचे, वचनबद्ध समुहाचे आणि विद्यार्थ्यांच्या कणखरवृत्तीचे कौतुक केले. 'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट'चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.रमेश दासवानी व 'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट'च्या संसाधन एकत्रीकरण विभागाच्या प्रमुख श्रीमती शीला अय्यर हेदेखील या भेटीदरम्यान देणगीदारांच्या सोबत होते.



# बातम्या आणि ताज्या घडामोडी

## 'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट'ने झारखंडमध्ये एन.बी.जे.के. च्या माध्यमातून एकत्र भागीदारींची सुरूवात केली :



संपूर्ण भारतात आपले कार्य पोहोचावे हे उद्दिष्ट समोर ठेवून 'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट'चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.रमेश दासवानी व 'लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट'च्या संसाधन एकत्रीकरण विभागाच्या प्रमुख श्रीमती शीला अय्यर यांनी नव भारत जागृती केंद्र (एन.बी.जे.के.) या स्वयंसेवी संस्थेला भेट दिली. दोन्ही संस्थांच्या दृष्टीने फायदेशीर ठरतील अशा भागीदारींचा विचार करण्यासाठी भेट देण्यात आली. ही संस्था झारखंड येथे १९७१ पासून कार्यरत असून ती तळागाळात प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर जाऊन काम करत आली आहे. तिचे काम झारखंड व बिहार इथे चालते. २३ व २४ एप्रिल अशा या दोन दिवसांच्या दौऱ्यात त्यांनी एन.बी.जे.के.च्या रांची येथील हजारीबाग इथल्या कार्यालयाला भेट दिली. यानंतर त्यांनी हजारीबाग इथे माध्यमिक शाळेच्या विद्यार्थीनींसोबत संस्थेतर्फे चालवल्या जाणाऱ्या रेमिडिअल वर्गांच्या केंद्राला भेट दिली. दुसऱ्या दिवशी त्यांनी झारखंडमधील चौपरन तालुक्यातील बेहरा येथे असलेल्या एन.बी.जे.के. तर्फे चालवल्या जाणाऱ्या सुरेखा प्रकाश भाई पब्लिक स्कूल या सी.बी.एस.सी. बोर्डाच्या शाळेला भेट दिली. त्यानंतर शेवटी एन.बी.जे.के.चे कार्यालय आणि त्यांचे रांची येथील कौशल्य व रोजगार केंद्र यांना भेट दिली गेली.



## संपर्क


**मुख्य कार्यालय :**
वन बी.के.सी., सी – विंग, युनीट क्र. १५१६, प्लॉट क्र. – सी. ६६, जी. ब्लॉक,
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१
दूरध्वनी क्र.: ९१-२२-६८३२ ७१२२
ईमेल : connect@lightoflifetrust.org

**इतर शाखा कार्यालये :**
**महाराष्ट्र :** अहमदनगर • अकोला • अलिबाग • चंद्रपूर • जालना,
कर्जत • माणगाव • मुंबई मुरबाड • नंदुरबार • वाशीम • यवतमाळ
**गुजरात :** कुकरमुंडा **मध्यप्रदेश :** सिओनी
**ओडीशा :** अंगुल **राजस्थान :** बिजोलिआ • सिकर


## भविष्यात येऊ घातलेल्या घडामोडी

